शालार्थ प्रणालीकरीता डीबी-२ लायसन्स खरेदी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः ईगव्ह-१५१८/प्र.क्र.१२/संगणक

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ३२

दिनांक:- ०४ मे, २०१८

संदर्भ :-

१. शासन ज्ञापन क्रमांकः ईगव्ह-१५१८/प्र.क्र.१२/संगणक, दि.०५ मार्च, २०१८.
२. शासन ज्ञापन क्रमांकः ईगव्ह-१५१८/प्र.क्र.१२/संगणक, दि.२७ मार्च, २०१८.
३. उद्योग ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र.भाखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग-३/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६
४. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. शिआ/ई-गव्हर्नन्स/ DB२ licence /२०१८-२०१९/ आस्था क्र. १४३/२२०१०, दि. १६.०४.२०१८

प्रस्तावना :-

१. ई-गव्हर्नन्स योजनेअंतर्गत विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या शासकीय खाजगी अनुदानित तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक विद्यालये व सैनिकी शाळांतील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वेतन देयके ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यासाठी सन २०१२ पासून शालार्थ प्रणाली सुरु करण्यात आली आहे.

२. शालांर्थ प्रणालीमध्ये तांत्रिक कारणामुळे दोष निर्माण झाल्याने शालार्थ प्रणाली बंद पडली आहे. सदर प्रणाली पुन्हा कार्यान्वीत करण्यासाठी व राज्यातील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनलाईन पध्दतीने देण्यासाठी आयबीएम कंपनीचे डीबी-२ लायसन्स आवश्यक असल्याने प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दिनांक १२.०२.२०१८ च्या बैठकीमध्ये उद्योग ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र.भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६ च्या परिशीष्ट क्र.३.२.६ मधील तरतूदीनुसार डीबी-२ लायसन्स आयबीएम कंपनीकडून एकल स्त्रोत पध्दतीने खरेदी करण्यासाठी दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी शासन ज्ञापनाद्वारे रु. १,२३,०८,०६६ इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली होती.

३. शिक्षण आयुक्त कार्यालयाने सदर खरेदीचे देयक कोषागार कार्यालयामध्ये सादर केले असता, कोषागार कार्यालयाने वित्त विभागाच्या दि. २९ जानेवारी,२०१८ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने खरेदी करण्यासाठी निर्बध असल्याने कोषागाराने देयक अदा केले नव्हते. संदर्भ ४ अन्वये आयुक्त (शिक्षण) यांनी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये डीबी-२ लायसन्स खर्चास मान्यता देण्याबाबत विनंती केली असुन डीबी-२ लायसन्स आयबीएम कंपनीचे अधिकृत पुरवठादार Velocis Systems Pvt. Limited या कंपनीकडून एकल स्त्रोत पध्दतीने खरेदीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

प्रकल्प अंमलबजावणी समितीला विभागातील ई-गव्हर्नन्स प्रकल्पासाठी Hardware software खरेदी करण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे या अधिकारानुसार शालार्थ प्रणालीसाठी डीबी-२ लायसन्स आयबीएम कंपनीचे अधिकृत पुरवठादार Velocis Systems Pvt. Limited या कंपनीकडून एकल स्त्रोत पध्दतीने खरेदी करण्यासाठी संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन राहून रुपये १,२३,०८,०६६/- इतकी रक्कम अदा करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च मागणी क्र. ई-२ २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२ एच ४५४) ३१ सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षातून सन२०१८-१९ मधील उपलब्ध तरतूदीमधून भागविण्यात यावा. यासाठी आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी, व सहायक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक संचलनालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०४१३०७०३४२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2018.05.04 13:10:42 +05'30'

(प्रविण मुंढे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) अमुस, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

२) प्र.स., माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई

३) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

४) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.,

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.

६) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्विय सहायक मंत्रालय.

७) सहायक संचालक, (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक संचलनालय, पुणे.

८) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे

९) निवडनस्ती- संगणक